**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, NOV-DEC, 2018, VOL- 6/48*

# बी.एड अभ्यासक्रम पूर्ण करताना छात्राध्यापकांना येणा-या समस्यांचा अभ्यास

**प्रा.मोहन सखाराम कांबळे**

*आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, पुणे*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1. प्रास्ताविक :

शिक्षणाशिवाय कोणाचीही प्रगती होऊ शकणार नाही असे थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसुधारक महात्मा फुले यांनी १८ व्या शतकात समाजाची दुरावस्था पाहून वास्तव लिहून ठेवले. शिक्षणामुळे मानवाला आपले भविष्य उज्वल करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते .या सामर्थ्याच्या जोरावर तो जीवनातील विविध समस्यांना आत्मविश्वासाने समोरे जात असतो. शिक्षणाच्या माध्यमातूनच त्याच्या विविध क्षमतांचा विकास साधलाजात असतो. त्यातूनच त्याचे जीवन गतिमान होत असते. ज्ञान संपादन क्षमता, तर्क व विचार क्षमता व्यवहारिक कार्य क्षमता, सामाजिक गुणांचा विकास नागरिकत्व व राष्ट्रीयत्व आणि चारित्र्य संवर्धन या सर्व बाबींचा विकास व्यक्तीमध्ये शिक्षणाव्दारेच होत असतो. त्यामुळे कोणतेही राष्ट्र आपल्या जनतेच्या शिक्षणाची नितांत काळजी वाहत असते कारण त्यावरच राष्ट्राचा विकास अवलंबून असतो .या विकासामध्ये शिक्षकाची भूमिका अधिक महत्त्वाची आहे . सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय आहे ते साध्य करण्यासाठी समाजाने शिक्षण यंत्रणा निर्माण केली या यंत्रणेचे यश हे मुख्यता शिक्षकावर अवलंबून असते. राष्ट्राच्या जडणघडणीत प्रत्यक्षपणे न दिसणारे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे ते या

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

शिक्षकांचेच .शिक्षणाच्या आधारावर आज समाजाची प्रगती सुरू आहे पण याचा मूलाधार हा शिक्षकच आहे हे विसरून चालणार नाही .विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधायचा असेल तर शिक्षक हा गुणवत्ता धारकच असला पाहिजे . "दर्जेदार शिक्षणाला आवश्यक असलेली गोष्ट म्हणजे दर्जेदार शिक्षक ." तरच चांगले नागरिक निर्माण होऊ शकतील .

गुणवत्तापूर्ण शिक्षक निर्माण करण्यासाठी त्याला गुणवत्तापूर्णच प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे . प्रशिक्षण हे दोन प्रकारचे असते सेवापूर्ण प्रशिक्षण व सेवांतर्गत प्रशिक्षण . सेवांतर्गत प्रशिक्षणामधून शिक्षकाचे ज्ञान अद्ययावत रहावे, अध्यापन शास्त्रातील बदल त्याला माहित व्हावेत, शिक्षकाला आपली कर्तव्ये व जबाबद-या यांचे ज्ञान व्हावे आणि या सर्वातून शिक्षकाचा व्यवसायिक विकास साधला जातो . सेवांतर्गत प्रशिक्षण जसे शिक्षकाचा व्यावसायिक विकास करते तसेच त्याच्या जडणघडणीमध्ये सेवापूर्व प्रशिक्षणाचे अनन्य साधारण महत्त्व आहे . विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी ही शिक्षकावर येते जर त्याला गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण दिले तर तो ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकेल . सेवापूर्व प्रशिक्षणामध्ये शिक्षकाला अध्यापनाचे शास्त्रशुद्ध ज्ञान मिळू लागले . ज्ञान या संकल्पनेत अनेक बाबींचा समावेश होतो . माहिती मिळविणे,त्यातील विविध संकल्पना जाणून घेणे, त्यातील मर्म समजणे, विविध बाबींचा आंतरिक संबंध व रचना कळणे, माहिती स्मरणात राहणे, ती वेळच्यावेळी आठवणे, माहितीचा व्यक्तिमत्वावर परिणाम होऊन शहाणपण व मर्मदृष्टि प्राप्त होणे इ.बाबींचा समावेश होतो

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

2. **संशोधन समस्या** –एक वर्ष कालावधी बी.एड अभ्यासक्रम पूर्ण करताना छात्राध्यापकांना येणा-या समस्यांचा अभ्यास

3. **कार्यात्मिक व्याख्या**

   1. **बी.एड-** माध्यमिक शिक्षक होण्यासाठी घेण्यात येणारे सेवापूर्व प्रशिक्षण.
   2. **कालावधी -** सेवापूर्व प्रशिक्षण पूर्णण्यासाठी लागणारा वेळ.
   3. **अभ्यासक्रम -** बी.एड साठी विद्यापीठाने तयार केलेला अभ्यासक्रम.
   4. **छात्राध्यापक-** माध्यमिक शिक्षक होण्यासाठी सेवापूर्व प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी
   5. **समस्या-** बी.एड अभ्यासक्रम पुर्ण करताना येणा-या अडचणी.

4. उदिदष्ट

   1. छात्राध्यापकांना अभ्यासक्रमामध्ये येणा-या अडचणींचा शोध घेणे
   2. छात्राध्यापकांना येणा-या अडचणींचे वर्गीकरण करणे.
   3. अडचणींवर उपाय योजना सुचविणे.

5. गृहितके-

1. बी.एड ची प्रवेश प्रक्रिया उशीर होत आहे.
2. बी.एड ची प्रवेश प्रक्रिया उशीरा झाल्यास कामाचे दिवस कमी होतात.
3. कमी कालावधीमध्ये सर्व अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.
4. कमी कालावधीमध्ये सर्व अभ्यासक्रम पूर्ण करावा लागत असल्याने छात्राध्यापकांवर याचा ताण येतो.
5. शिक्षक होण्यासाठी आवश्यक कौशल्यपूर्ण करताना अडचणी येतात.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**6. संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा**

**व्याप्ती** – बी.एडचे सर्व छात्राध्यापक

**मर्यादा-** संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून आहे.

**परिमर्यादा** –

1. सदर संशोधन हे टिळक शिक्षण महाविद्यालया व आदर्श शिक्षण महाविद्यालयापुरतेच मर्यादित आहे.
2. सदर संशोधन बी.एड छात्राध्यापकांपुरतेच मर्यादित आहे.
3. सदर संशोधन हे 120 विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे
4. सदर संशोधन हे बी.एड अभ्यासक्रमातील समस्यांपुरतेच मर्यादित आहे.

7. **संशोधन पध्दती -**

सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर संशोधिकेने केला आहे.

**8. जनसंख्या व न्यादर्श** –

**जनसंख्या** –

महाराष्ट्र राज्यातील बी.एडचे सर्व छात्राध्यापक

**न्यादर्श** –

120 बी.एड छात्राध्यापकांची न्यादर्श म्हणून निवड केली जाईल.

**9. माहिती संकलन साधने** –

सदर संशोधनात माहिती संकलनासाठी संशोधिकेने प्रश्नावलीचा वापर करुन ती छात्राध्यापकांकडून भरून घेतली .

**10. संख्याशास्त्रीय तंत्रे –**

सदर संशोधनासाठी संशोधिकेने शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला आहे.

**11. संशोधनाचे निष्कर्ष –**

1. परीक्षा, CCE, Practicals,PPT Presentation , Poster Presentation, यासाठी लागणारा वेळ उपलब्ध होत नाही याचा विदयार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो
2. B.Ed ला उपलब्ध होणारा कालवधी कमी झाल्यामुळे पाठांच्या तयारीला आवश्यक तेवढा वेळ मिळत नाही त्याचा परिणाम हा अध्यापनावर दिसून येतो
3. शाळेतील शिक्षकांना नवीन प्रवाह माहीत नसल्याने त्याचा परिणाम विदयार्थ्यांच्या गुणांवर होतो.
4. एकाच वेळी सर्व प्रात्यक्षिकांची माहिती दिल्यामुळे गोंधळ निर्माण होतो.
5. शाळेमध्ये छात्रसेवा कालावधीत विदयार्थ्यांना त्या कालावधीतील अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी वेळ उपलब्ध होत नाही.
6. छात्रसेवा कालावधीसाठी आलेल्या विदयार्थ्यांकडून जास्तीत जास्त शाळेची कामे पुर्ण करून घेण्याकडे शाळेतील शिक्षकांचा कल असतो.
7. अवघड प्रात्यक्षिकांची माहिती वेगळया तासिकेला देण्यात यावी
8. कार्यक्रमाची उपयुक्तेनुसारच नियोजन असावे नाहीतर त्याचा विदयार्थ्यांना लाभ होत नाही
9. SS विषयांची उपविषयांची सुचत नाही.
10. H P उपक्रमांची यादी असावी
11. सहशालेय उपक्रमांची यादी वर्षाच्या सुरूवातीलाच मिळावी

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

## 12. उपाय योजना –

1. प्रत्येक कार्यक्रमाचे अचूक नियोजन असावे.
2. वर्षाच्या सुरवातीलाच CEP , MCQ, PPT Presentation , Poster Presentation व परीक्षा यांचे घटक दयावेत.
3. पाठांच्या तयारी साठी वेळ दयावा
4. वर्षाच्या सुरवातीलाच शाळांकडून पाठांच्या व छात्रसेवाकालाच्या तारखा व घटक निश्चित करून घ्यावेत.
5. शाळेतील शिक्षकांचे नवीन प्रवाहाबाबत उदबोधन करावे
6. प्रात्यक्षिक दर तीन दिवसातून एका प्रात्यक्षिकाचे उदबोधन व्हावे.
7. Health & yoga साठी व्यायामाचे प्रकार निश्चित करावे व वेळेचाही विचार करावा
8. सुरवातीच्या काळात SS संदर्भात मार्गदर्शन करावे
9. एकावेळी एकच कार्यक्रम घेण्यात यावा ते परीक्षा कालावधी मध्ये नसावेत.
10. कृती संशोधन करताना संशोधना संदर्भात अनेक अडचणी येतात.

## 13. शिफारशी

**महाविदयालय**

कमी कालावधीमध्ये काटेकोर नियोजनाची अंमलबजावणी करावी.

एकावेळी एकच कार्यक्रम घेण्याकडे कल असावा

**विद्यापीठ**

सत्रांमध्ये बदल करावा जेणे करून अधिक वेळ उपलब्ध होऊ शकेल.

## संदर्भ

*मुळे, उमाठे, (१९८७), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे", महाराष्ट्र विद्यापीठग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर-४४०००१,*

*भिंताडे वि. रा., (२००४), "शैक्षणिक संशोधन पध्दती", नूतन प्रकाशन, पुणे*

*पारसनीस न., (१९९३), "शिक्षकांचे प्रशिक्षण", नूतन प्रकाशन, पुणे – ३०.*

*शिंदे ,डी. (ऑक्टो2010) शिक्षकांचे शिक्षण प्रक्रियेतील स्थान ,भारतीय शिक्षण*

*Best John W., Kahn James V., (1992), "Research in Education", Prentice Hall of India, Private Hed. New Delhi-110001.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*